कंट्रोल मो.9137758484
ई-मेल-srpfgr11@rediffmail.com
cmdt.srpf११.navimum@mahapolice.gov.in

समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.11 नवी मुंबई,
कॅम्प तळोजा, ता.जि.ठाणे.

जा.क्र.रारापोबल /गट-11/ पोलीस भरती- /लेखी परीक्षा/ २०२४/ 3183 / नवी मुंबई दिनांक 08.08.2024

## राज्य राखीव पोलीस बल गट क्र.११ नवी मुंबई
## सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३
## लेखी परिक्षेकरीता १:१० या प्रमाणात पात्र उमेदवारांची अंतिम यादी

## -:उमेदवारांना सुचना :-

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.11 नवी मुंबई या आस्थापनेवर सन 2022–23 मधील सशस्त्र पोलीस शिपाई पदांची लेखी परिक्षा दि. 13/08/2024 रोजी खालील ठिकाणी व वेळी आयोजित करण्यात आलेली आहे. दि.05/08/2024 रोजी लेखी परिक्षेस पात्र उमेदवारांची अंतिम यादी www.mahapolice.gov.in, maharashtrasrpf.gov.in व महाआयटीच्या संकेतस्थळावर दि.05/08/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

| लेखी परिक्षा केंद्रचे ठिकाण | दिनांक व वेळ | लेखी परिक्षा केंद्र किंवा ठिकाणापर्यंत पोहचण्याकरिता ऑनलाईन लिंक व बारकोड स्कॅनर ( Scanner ) सह |
|---|---|---|
| लोढा इंडस्ट्रियल अँन्ड लॉजेस्टिक पार्क फेज–2, पलावा, नान्हेण–उसाटने गाव, तळोजा बायपास रोड, कल्याण– (पुर्व), ठाणे 421204. | दिनांक 13/08/2024 रोजी दुपारी 11:30 ते 1:00 वा.पर्यंत | https://maps.app.goo.gl/XAGQhUZRXLCsnsvW6 |

| नजिकचे बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशन व येण्याजाण्याच्या मार्गाची माहिती व परिक्षा केंद्राजवळील बस स्टॉप |
|---|
| १ कल्याण जंक्शन, रेल्वे स्टेशन (पुर्व) /पनवेल रेल्वे स्टेशन / डोंबिवली रेल्वे स्टेशन (पुर्व) |
| २ कल्याण बस स्टॅन्ड : बस स्टॉप–नान्हेण फाटा (मार्गे खोनी – तळोजा बायपास रोड) |
| ३ पनवेल बस स्टॅन्ड / वाशी बस स्टॅन्ड : बस स्टॉप–नान्हेण फाटा (मार्गे नावडे फाटा – तळोजा बायपास रोड) |

१) सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेकरीता महाआयटी कडुन अदा केलेल्या प्रवेश पत्रात नमुद दिनांकास परिक्षा केंद्रावर सकाळी ठिक 08:00 वाजेपर्यंत हजर राहावे. त्यानंतर आलेल्या कोणत्याही उमेदवारांस परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

२) लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्राशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. परिक्षा केंद्रावर आलेल्या उमेदवाराने पर्यवेक्षकांसमोर हजेरी पटावर फोटो लावुन स्वाक्षरी करावी.

३) उमेदवारांनी स्वतःची ओळख पटविण्यासाठी शासनाने जारी केलेल्या आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट, महाविद्यालयीन ओळखपत्र, वाहनपरवाना यापैकी कोणतेही एक मुळ आणि वैध ओळखपत्र व लेखी परिक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र (हॉल तिकिट) तसेच दोन फोटो सोबत आणावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही.

४) उमेदवारांना सदर लेखी परिक्षेकरिता या कार्यालयाकडुन काळे पेन व पॅड पुरविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सोबत येतांना इतर अनावश्यक वस्तु आणु नये, आणल्यास सदरच्या वस्तु परिक्षा केंद्राच्या बाहेर ठेवण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील.

५) उमेदवारांस परिक्षा वर्गावर मोबाईल, घडयाळ, ब्लुटुथ, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, कॅक्ल्युलेटर, नोटपॅड, नोटबुक, तसेच बटण कॅमेरा, पेन कॅमेरा यासारखी इतर इलेक्ट्रानिक उपकरणे, प्रतिबंधक वस्तु स्वतःजवळ बाळगणेस पुर्णतः मनाई आहे. अशा वस्तु आढळल्यास उमेदवारास भरती प्रकियेतुन बाद ठरवुन त्यांची उमेदवारी रदद् करण्याबरोबर गुन्हा नोंद करण्यात येईल.

६) एखादा उमेदवार लेखी परिक्षेस गैरहजर राहिल्यास, त्याला पुन्हा लेखी परिक्षा घेण्याबाबत कोणतीही अतिरिक्त संधी देण्यात येणार नाही. त्याला संपुर्ण भरती प्रकियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

७) उमेदवार भरती प्रकियेमध्ये उध्दट, गैरवर्तन, अनुचित प्रकार केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरण्याच्या, कॉपी करण्याचा अथवा डमी उमेदवार बसविण्याचा प्रयत्न केल्यास त्यास त्याच क्षणी भरती प्रकियेतुन बाद करून गुन्हा नोंद करण्यात येईल.

८) उमेदवार अथवा त्यांचे नातेवाईक यांनी कोणत्याही एजंट/ दलाल , अधिकारी/कर्मचारी यांच्या भुलथापांना / अमिशाला बळी पडु नये, उमेदवारांची निवड ही सर्व निकष गुणवत्तेच्या पात्रतेवर होईल.

सशस्त्र पोलीस शिपाई पदांच्या लेखी परिक्षेकरिता पात्र उमेदवारांची यादी, लेखी परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण याबाबतची माहीती राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **maharashtrasrpf.gov.in** मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संकेतस्थळ **www.mahapolice.gov.in** व महाआयटी विभागाचे **policerecruitment2024.mahait.org** या तिन्ही संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

( मोक्षदा पाटील ) भापोसे,
समादेशक.(अति कार्य)
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई.

प्रत सविनय सादर,

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई ( लक्षवेध – संगणक कक्ष )
2/– राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.11, नवी मुंबई येथील सन 2022–23 पोलीस भरतीमधील उमेदवारांची 1:10 प्रमाणे लेखी परिक्षेकरिता अंतिम यादी महा आय टी च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

प्रत सविनय सादर,
मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned with OKEN Scanner

प्रत माहीतीकरीता सादर,

मा अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

मा विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परीक्षेत्र पुणे.

प्रत माहीती व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता,

मा व्यवस्थापक, महा आयटी, महाराष्ट राज्य, मुंबई

2/– राज्य राखीव पोलीस बल गट क 11 नवी मुंबई येथील सन 2022.23 मधिल पोलीस भरतीमधील लेखी परिक्षेकरीता अंतिम यादी महा आयटीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती .

3/– तसेच लेखी परिक्षेकरीता येणा–या उमेदवार यांना हॉलतिकीट वाटप करून त्यांना परिक्ष केंद्र येथे जाण्याकरीता संदेश (SMS)सोबत त्यांना परिक्षा केंद्र ठिकाणापर्यंत पोहचण्याकरीता ऑनलाईन लिंक व बारकोड स्कॅनर (Scanner)पाठविण्यात यावे ही विनंती .

Scanned with OKEN Scanner